# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परिक्षा व मुल्यमापन मंडळ

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : coegondwana@gmail.com

जा. क्र. गो.वि./परिक्षा वि./२३६८/२०२४

दिनांक ०७/०८/२०२४

## नामांकन परिपत्रक

(नामांकन सत्र २०२४–२५)

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य, विभागप्रमुख पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग, विद्यार्थी तसेच संबधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०२४–२५ च्या प्रवेश प्रक्रियेची कार्यवाही सुरू झालेली असून महाविद्यालयांना नामांकनाच्या Online प्रक्रिया संदर्भात खालील प्रमाणे महत्वपुर्ण सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) महाविद्यालयामध्ये दिनांक ०७/०८/२०२४ पर्यंत Online झालेले सर्व विद्यार्थ्याचे प्रवेश विद्यापीठाला Online Submit to Registration (Data Upload) करून विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे.

२) कुलसचिव यांचे कार्यालय मधून जाहीर केलेली गो.वि./कु.स.का./३२४/२०२४, दिनांक ३०/०८/२०२४ नुसार प्रति विद्यार्थी रू. २००/–प्रमाणे नामांकन शुल्क घेण्यात यावे. नामांकन शुल्क NEFT/RTGS पध्दतीने बँक ऑफ इंडिया शाखा, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली मधील विद्यापीठाचे खाते क्र 964810210000022 (IFSC Code- BKID0009648) मध्ये रक्कम जमा करावे. सर्व नामांकन फार्म शुल्क पावतीसोबत दि. १६ ऑगस्ट २०२४ पर्यंत विद्यापीठाकडे जमा करावे.

३) विद्यापीठात नामांकन आवेदनपत्र सादर करतेवेळी महाविद्यालयाने खालील प्रमाणे कागदपत्रे जोडणे अनिवार्य राहील.

- I) नियमित/ कार्यकारी प्राचार्य यांना स्वाक्षरीचे अधिकार प्रदान केले असल्याचे पत्र/स्वाक्षरी नमुना.
- II) वित्त विभागाचे ना देय प्रमाणपत्र.
- III) विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण पत्र.
- IV) शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या वर्षाचे संलग्निकरण प्रमाणपत्र.
- v) अभ्यासक्रमाला शासनाने दिलेले मान्यता पत्र.
- vi) महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे प्रमाणपत्र.
  ज्या महाविद्यालयाने १०% पेक्षा किंवा जास्त वाढीव प्रवेश घेतलेले आहेत त्या महाविद्यालयाने वाढीव प्रवेश क्षमतेचे विद्यापीठाचे मंजुरीपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- vii) नामांकन आवेदन पत्रासोबत विद्यार्थ्यांचे Eligibility Status Report जोडणे आवश्यक आहे.

४) महाविद्यालयाने नामांकन सादर करीत असतांना सदर माहीती Form A, B & Form E, F मध्ये सादर करावी. ही सर्व प्रपत्रे www.unigug.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सोबत Soft Copy(CD) देण्यात यावी.

५) विद्यार्थ्याचे नामांकन हे नियोजित वेळेतच झाले पाहिजे. ज्या विद्यार्थ्याचे नामांकन होणार नाही, अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र उपलब्ध होणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

६) महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्या विद्यार्थ्यांची सदर अभ्यासक्रमासाठी असलेली आवश्यक शैक्षणिक पात्रता तपासूनच विद्यापीठाच्या निदेशानुसारच प्रवेश द्यावा. अपात्र असलेल्या विद्यार्थ्याला प्रवेश दिल्यास विद्यापीठाद्वारे त्यांचे नामांकन रद्द केले जाईल व त्यांची सर्वस्वी जबाबदारी ही त्या संबंधीत महाविद्यालयाची राहील.

७) ज्या महाविद्यालयांना विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द (Admission Cancel) करावयाचे असेल त्यांनी आपल्या महाविद्यालयांच्या लेटरहेडवर प्राचार्याच्या स्वाक्षरीसह त्या विद्यार्थ्यांचे नाव, अभ्यासक्रम, सेमीस्टर व Online Eligibility No. लिहून विद्यापीठात सादर करून तात्काळ प्रवेश रद्द करावे.

८) बाहेरील विद्यापीठाच्या/ बोर्डच्या विद्यार्थ्यांचे नामांकन करतेवळी सदर विद्यार्थ्यांचे स्थलांतरण प्रमाणपत्र व योग्यता प्रमाणपत्र घेवूनच प्रवेश निश्चित करावा. तसेच गो.वि.ग/विद्या/क्र/५६४/२०२२, दि. १८/०८/२०२२ नुसार कार्यवाही घेवून Immigration (प्रवजन) शुल्क व्यावसायीक अभ्यासक्रमाकरिता रू. २००/– व अव्यावसायीक अभ्यासक्रमाकरिता रू. १००/– भरणे आवश्यक आहे.

९) महाविद्यालयाने प्रवेशित विद्यार्थ्यांचे नामांकन करतांना स्थलांतरण प्रमाणपत्र (Migration Certificate) व योग्यता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) विद्यापीठात सादर करणे अनिवार्य आहे.

१०) जे महाविद्यालय संबंधित विद्यार्थ्यांचे स्थलांतरण प्रमाणपत्र (Migration Certificate) विद्यापीठात सादर करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र स्विकारण्यात येणार नाही.

तरी सर्व मा. प्राचार्य तथा मा. विभागप्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग तसेच संबधितांनी वरील अटीचे तंतोतंत पालन करून विद्यापीठाकडे नामांकनाकरिता प्रस्ताव सादर करावे.

( दिनेश ज. नरोटे )
संचालक (प्रभारी)
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रतिलिपी:–

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
२. मा. प्र–कुलगुरू महोदय, यांचे कार्यालय गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
४. मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
५. मा. प्राचार्य, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संलग्नित सर्व महाविद्यालये.
६. विभागप्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
७. उपकुलसचिव, परीक्षा पुर्व/उपरांत, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
८. उपकुलसचिव,महाविद्यालयीन विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
९. संगणक विभाग प्रमुख सदर परीपत्रक संकेतस्थळावर अपलोड करावे.